# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी – 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.

E-Mail: desk10@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


**तात्काळ/ईमेलव्दारे/ कालमर्यादित**

क्रमांक: 10/एडीएम/पदविका/2017/ 3८७९

दिनांक : 24 AUG 2017

प्रति,

प्राचार्य,

सर्व पोस्ट एच.एस.सी. प्रथम वर्ष प्रथम वर्ष पदविका

औषधनिर्माणशास्त्र /सरफेस कोटिंग टेक्नॉलॉजी/एचएमसीटी

अभ्यासक्रमातील शासकीय / अशासकीय अनुदानित संस्था

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील पोस्ट एच.एस.सी. प्रथम वर्ष पदविका औषधनिर्माणशास्त्र /सरफेस कोटिंग टेक्नॉलॉजी/एचएमसीटी अभ्यासक्रमाच्या शासकीय/अशासकीय अनुदानित संस्थेतील चौथ्या फेरीनंतर रिक्त राहिलेल्या जागा संस्थास्तरावर भरणेबाबत...

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील पोस्ट एच.एस.सी. प्रथम वर्ष पदविका औषधनिर्माणशास्त्र /सरफेस कोटिंग टेक्नॉलॉजी/एचएमसीटी अभ्यासक्रमातील शासकीय/अशासकीय अनुदानित संस्थेतील चौथी फेरीनंतर रिक्त होणाऱ्या जागांमध्ये प्रवेश घेण्याकरिता उमेदवारांना पुढीलप्रमाणे एक संधी देण्यात येत आहे .

केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेकरिता विहित कालावधीत ऑनलाईन रजिस्ट्रेशन केलेले उमेदवार व जे उमेदवार दि. २४.०८.२०१७ पर्यंत नॉन-कॅप करिता रजिस्ट्रर करणार अशा उमेदवारांसाठी शासन, उच्च व तंत्रशिक्षण, अधिसूचना क्रमांक टीईएम-२०१६/सीआर ४७३/१६ (पार्ट-२)/टीई - दि. २४.०४.२०१७ मधील नियम क्रमांक १३ मध्ये विनाअनुदानित संस्थेस तरतुदी लागु केल्या आहेत त्यापैकी शासकीय/अशासकीय अनुदानित संस्थेस लागु असलेली तरतुद विचारात घेऊन त्याप्रमाणे संस्थास्तरावर प्रवेश करण्यासाठी दि. २८.०८.२०१७ ते २९.०८.२०१७ पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत प्रवेश प्रक्रिया पार पाडण्यास या संचालनालयाची परवानगी देण्यात येत आहे. सदर प्रकियेसाठी पोस्ट एच.एस.सी. प्रथम वर्ष पदविका औषधनिर्माणशास्त्र /सरफेस कोटिंग टेक्नॉलॉजी/एचएमसीटी अभ्यासक्रमातील संस्थेची जाहिरात जिल्हास्तरीय स्थानिक वृत्तपत्रात व संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी व उमेदवारांची गुणवत्ता यादी दि. २८.०८.२०१७ पुर्वी पोस्ट संबंधित शासकीय/अशासकीय अनुदानित संस्थेच्या नोटीस बोर्डावर व संस्थेचा संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

सदर प्रवेश प्रक्रियेत प्रवेश घेतेलेल्या विद्यार्थ्यांची ऑनलाईन माहिती संचालनालयाच्या संकेतस्थळावर दि. ३१.०८.२०१७ पर्यंत (Cut off date of admission) भरण्यात यावी.

तसेच पोस्ट एच.एस.सी. प्रथम वर्ष पदविका औषधनिर्माणशास्त्र /सरफेस कोटिंग टेक्नॉलॉजी/एचएमसीटी अभ्यासक्रमातील शासकीय/अशासकीय अनुदानित संस्थेतील चौथी फेरीनंतर रिक्त होणाऱ्या जागांकरिता देण्यात येत असलेल्या प्रवेशासाठीच्या संधीच्या अनुषंगाने विनाअनुदानित संस्थांना संस्थास्तरावरील प्रवेश दि. ३१.०८.२०१७ पर्यंतच (cut off date of admission) राहणार आहेत, यांची संबंधितांनी नोंद घेण्यात यावी.

(चंद्रशेखर ओक) भा.प्र.से.

संचालक,

तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई

प्रत: मा.आयुक्त,राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना माहितीस्तव सादर

प्रतिलिपी: १. कार्यासन अधिकारी, आय.टी. सेल, तंत्रशिक्षण, मुख्य कार्यालय मुंबई यांना कळविण्यात येते की, वर नमूद केल्याप्रमाणे सदर पत्र विदयार्थी/पालकांच्या व संबंधित शासकीय/अशासकीय अनुदानित संस्थांच्या माहितीकरीता संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात याव्यात व प्रवेश प्रक्रियेचा अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करावी.

२. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,अमरावती, नागपुर यांना माहिती व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.

३. प्राचार्य, पोस्ट एच.एस.सी. प्रथम वर्ष विनाअनुदानित पदविका औषधनिर्माणशास्त्र /सरफेस कोटिंग टेक्नॉलॉजी / एचएमसीटी अभ्यासक्रमातील संस्थाना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.

C:\Users\desk10\Desktop\councelling round of govt and aided.docx